# प्रकरण चौथे

# इचलकरंजी नगरपरिषदेतील महिलांचे राजकीय निर्णय प्रक्रियेतील सहभाग व स्थानिक विकासातील प्रभाव

# प्रकरण — चौथे

## इचलकरंजी नगरपरिषदेतील महिलांचे राजकीय निर्णय प्रक्रियेतील सहभाग व स्थानिक विकासातील प्रभाव

---

४.१ निर्णय निर्धारण प्रक्रिया

४.२ इचलकरंजी नगरपरिषदेतील महिलांचे राजकीय निर्णय प्रक्रियेतील सहभाग

४.३ इचलकरंजी नगरपरिषदेतील महिलांचे स्थानिक विकासातील प्रभाव

४.४ समारोप

## ४.० इचलकरंजी नगरपरिषदेतील महिलांचे राजकीय निर्णय प्रक्रियेतील सहभाग व स्थानिक विकासातील प्रभावः—

प्रस्तुत प्रकरणामध्ये इचलकरंजी नगरपरिषदेतील महिलांचा राजकीय निर्णय प्रक्रियेतील सहभागाचा आढावा घेतला असून या निर्णय प्रक्रियेच्या माध्यमातून त्यांचा स्थानिक प्रश्नांचा कशा पध्दतीने सोडवणूक करतात. याचा आढावा विविध प्रश्न व उपप्रश्नांच्या माध्यमातून जाणून घेवून त्याबद्दलची पुढील मांडणी केली आहे.

### ४.१ निर्णय निर्धारण प्रक्रियाः—

प्रशासनामध्ये निर्णय निर्धारण प्रक्रिया अंत्यत जटील समजली जात असून या निर्णयाचे प्रशासनातील कामकाजावर चांगला वाईट परिणाम दिसून येतो. प्रशासनाची कार्यक्षमता निर्णय प्रक्रियेवरच अवलंबून असते. त्यामुळे निर्णय प्रक्रियेचे महत्व प्रशासनामध्ये असलेले दिसून येते. त्यानूसारच शहरी स्थानिक संस्थामध्ये निवडून आलेल्या महिला प्रतिनिधींचा निर्णय प्रक्रियेतील सहभागाचा आढावा घेताना इचलकरंजी नगरपालिकेच्या संदर्भात तो आढावा घेण्यात आलेला आहे.

प्रशासनातील निर्णय प्रक्रियेविषयी जॉर्ज आर. टेरिफ विचारवंत म्हणतो की, निर्णय घेताना दोन किंवा दोन पेक्षा अधिक संभाव्य पर्याय आपल्या समोर असतात. त्या पर्यायातून आपल्याला एकच पर्याय निवडावयाचा असतो. निर्णय प्रक्रियातील महिलांच्या सहभागांच्या संबधी डॉ. लीला पाटील म्हणतात की, निर्णय घेणे हे कुटुंबामध्ये स्त्री व पुरूषांच्याकडे असणे आवश्यक आहे. परंतू या निर्णय प्रक्रियेमध्ये महिलांना स्थान दिले जात नाही असे दिसून येते. या निर्णय प्रक्रियेत महिलांचा सहभाग अतिशय कमी दिसून येतो. भारताच्या राजकीय व्यवस्थेकडे पाहिले असता आपणास असे दिसून येते की, भारतामध्ये उच्च स्तरावर इंदिरा गांधी यांच्या रूपाने महिला नेतृत्व शासन व्यवस्थेत अस्तित्वात होते. अलिकडे विविध राज्यांचा विचार केला असता, मुख्यमंत्री असो किंवा राजकीय पक्षाचे नेतृत्व असो महिलांचा सहभाग आपल्याला दिसून येतो. लोकसंख्येच्या दृष्टिकोनातून विचार केला असता महिलांचा राजकीय सहभाग जागतिक स्तरावर १५ टक्के पेक्षा कमी आहे. भारतात आत्तापर्यंत

लोकसभेतील महिला खासदारांचा विचार केला असता ५० पेक्षा अधिक खासदार कोणत्याही लोकसभेच्या निवडणूकीला निवडून आलेल्या नाहीत व भारतीय कार्यकारी मंडळामध्ये १० पेक्षा जास्त महिला मंत्री कधीच नव्हत्या. ही स्थिती महाराष्ट्र राज्य विधिमंडळात दिसून येते.

स्थानिक स्वराज्य संस्थेच्यादृष्टिने विचार केला असता, स्थानिक स्वराज्य संस्था ही नगरपरिषदेच्या माध्यमातून शहराचा सार्वजनिक विकास करीत असते. इचलकरंजी नगरपरिषदेच्या दृष्टिकोनातून महिलांचा राजकीय निर्णय प्रक्रियेतील सहभागाचा खालील प्रश्नांच्या माध्यमातून घेण्यात आला.

## ४.२ इचलकरंजी नगरपरिषदेतील महिलांचे राजकीय निर्णय प्रक्रियेतील सहभागः—

इचलकरंजी नगरपरिषदेतील महिलांचा राजकीय निर्णय प्रक्रियेतील सहभाग जाणून घेण्यासाठी इचलकरंजी नगरपारिषदेच्या महिला सदस्यांना प्रश्नावालीच्या माध्यमातून त्यांचा निर्णय प्रक्रियेतील सहभाग पुढीलप्रमाणे दिसून आला.


**तक्ता क्रं. ४.१**

**महिला प्रतिनिधी व नगरपरिषदेच्या वर्षातील बैठका**

| अ. नं. | वर्षातील बैठका | प्रतिनिधी | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | एकवेळा | ०७ | १६.२८ |
| २ | दोनवेळा | ०५ | ११.६३ |
| ३ | दोन पेक्षा जास्त | ३१ | ७२.०९ |
| | एकूण | ४३ | १०० |

स्त्रोतः— प्रश्नावली नूसार

आलेख क्रं. ४.१




वरील तक्त्याचे अवलोकन करताना असे दिसून येते की, इचलकरंजी नगरपरिषदेतील २००१ व २००६ मधील निवडून आलेल्या ४३ महिलापैकी ०७ महिला सदस्य या नगरपालिकेच्या होणा–या बैठकीत एकवेळ उपस्थित राहत असलेले दिसून आले आहे. तर ३१ महिला सदस्य नगरपरिषदेच्या बैठकांना दोन पेक्षा अधिक वेळा उपस्थित असलेल्या दिसतात. त्याचप्रमाणे आलेखावरून एकुण महिला सदस्यांपैकी ७२ टक्के महिला सदस्य नगरपरिषदेच्या बैठकांना दोन पेक्षा अधिक वेळा उपस्थित दिसत असल्याने महिलांचा नगरपरिषदेच्या सभागृहातील निर्णय प्रक्रियेत सहभाग असलेला दिसतो. यातून महिलांचा प्रशासनातील धोरण निर्धारण प्रक्रियेत सहभाग दिसून येतो.


तक्ता क्रं. ४.२

महिला सदस्य बैठकीच्या सूचना आणि त्याविषयी माहिती

| अ. नं. | पर्याय | प्रतिनिधी | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | होय | ४० | ९३.०२ |
| २ | नाही | ०३ | ०६.९८ |
| | एकूण | ४३ | १०० |

स्त्रोत:— प्रश्नावली नूसार

आलेख क्रं. ४.२




वरील तक्त्याचे अवलोकन केले असता इचलकरंजी नगरपरिषदेतील ४३ महिला सदस्यांतील ४० महिला सदस्यांना नगरपरिषदेच्या बैठकाची लेखी सूचना व बैठकीविषयी माहिती दिली जात असलेले दिसते. तर आलेखवरून फक्त ०७ टक्के महिला सदस्यांनाच बैठकी सूचना व बैठकीविषयी माहिती मिळत नसल्याचे दिसते. यावरून असे दिसते की, महिला सदस्यांना बैठकीच्या माहितीमुळे त्यांना आपल्या जबाबदारीची जाणीव होते. यातून ते नगरपरिषदेच्या विविध विषयामध्ये सहभाग घेतात.


**तक्ता क्रं. ४.३**

**महिला सदस्य वार्डच्या विकासासाठी मागणी**

| अ. नं. | पर्याय | प्रतिनिधी | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | होय | ४१ | ९५.३४ |
| २ | नाही | ०२ | ०४.६६ |
| | एकूण | ४३ | १०० |

स्त्रोत:— प्रश्नावली नूसार

आलेख क्रं. ४.३




वरील तक्त्याचे अवलोकन केले असता असे दिसते की, एकुण ४३ महिला सदस्यांपैकी ४१ महिला सदस्या इचलकरंजी नगरपरिषदेच्या बैठकांच्या माध्यमातून आपल्या प्रत्येक वार्डच्या विकासाकरिता अनुदानाची मागणी करतात. पुरूषांच्या तुलनेने महिलांचे वार्डच्या विकासासाठी जागृती आलेखातील ९५ टक्के महिलांच्या वार्ड विकासातील मांडलेल्या प्रश्नावरून दिसून येते. वरील विवेचनावरून असे दिसून येते की, महिलांचा वार्ड विकासाच्या माध्यमातून राजकीय निर्णय प्रक्रियेतील सहभाग आढळून येतो.


तक्ता क्रं. ४.४

महिला सदस्य व वार्षिक अंदाजप्रक्रियेतील सहभाग

| अ. नं. | पर्याय | प्रतिनिधी | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | होय | ३० | ६९.७६ |
| २ | नाही | १३ | ३०.२४ |
| | एकूण | ४३ | १०० |

स्त्रोतः— प्रश्नावली नूसार

आलेख क्रं. ४.४




वरील सारणीवरून इचलकरंजी नगरपरिषदेच्या वार्षिक अंदाजपत्रकामध्ये सभागृहातील एकुण महिला सदस्यापैकी ३० महिला सदस्य सहभाग घेतल्याचे आढळते. तर १३ महिला सदस्य सहभाग घेत नसल्याचे आढळते. एकुण सभागृहाच्या सदस्यांपैकी ६९. ७६ टक्के महिला सदस्य हया निर्णय प्रक्रियेत सहभाग घेत असल्याचे आढळते. यावरून असे स्पष्ट होते की, हळुहळु महिला नागरी प्रशासनाच्या आर्थिक प्रक्रियेत सहभाग घेताना दिसून येतात.

तक्ता क्रं. ४.५


महिला सदस्य व नगरपरिषदेच्या इतर विषयातील चर्चेत सहभाग

| अ. नं. | पर्याय | प्रतिनिधी | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | होय | ३७ | ८६.०४ |
| २ | नाही | ०६ | १३.९५ |
| | एकूण | ४३ | १०० |

स्त्रोतः— प्रश्नावली नूसार

SHIVAJI UNIVERSITY, KOL

आलेख क्रं. ४.५




वरील सारणीचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, इतर विषयांच्या निर्णय प्रक्रियेत महिलांचा सहभाग अधिक दिसून येतो. ४३ महिला सदस्यापैकी ३७ महिला सदस्य नगरपरिषदेच्या बैठकीत अंदाजपत्रकाशिवाय इतर विषयांच्या चर्चेत सहभाग घेतात. आलेखावरून १३.९५ टक्के महिलांचा सहभाग नगरपरिषदेच्या इतर विषयांच्या चर्चेत सहभाग घेत नसल्याचे दिसून येते. यावरून असे दिसून येते की, शहराच्या विकासाच्या संबंधी जे जे निर्णय घेतले जातात. त्या निर्णयामध्ये महिला सदस्यांचा सहभाग दिसून येतो. या महिला आपले मत मांडून आपला प्रभाव दाखवतात.


तक्ता क्रं. ४.६

महिला सदस्य व निर्णय प्रक्रियेत पुरूष सदस्यांचे सहकार्य

| अ. नं. | पर्याय | प्रतिनिधी | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | होय | ४० | ९३.०२ |
| २ | नाही | ०३ | ०६.९८ |
| | एकूण | ४३ | १०० |

स्त्रोतः— प्रश्नावली नूसार

**आलेख क्रं. ४.६**




उपरोक्त सारणीवरून असे दिसून येते की, एकुण ४३ महिला सदस्यांपैकी ४० महिला सदस्यांच्या निर्णय प्रक्रियेत पुरूष सदस्यांचे सहकार्य दिसून येते. तर ०३ महिला सदस्या या निर्णय प्रक्रियेत पुरूष सदस्यांचे सहकार्य दिसून येत नाही. आलेखावरून ९३.०३ टक्के महिला सदस्यांच्या निर्णय प्रक्रियेत पुरूष सदस्यांचे सहकार्य दिसून येत असून यावरून असे स्पष्ट होते की, महिलांच्या निर्णय प्रक्रियेत पुरूष सदस्यांचे सहकार्य व प्रोत्साहान दिसून येते. ज्यामुळे महिलांमध्ये निर्णय घेण्याची क्षमता वाढीस लागण्यास मदत होईल.


**तक्ता क्रं. ४.७**

**महिला सदस्य व कुटुंबाचे सहकार्य**

| अ. नं. | पर्याय | प्रतिनिधी | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | होय | ३० | ६९.७६ |
| २ | नाही | १३ | ३०.२४ |
| | एकूण | ४३ | १०० |

स्त्रोतः— प्रश्नावली नूसार

आलेख क्रं. ४.७




वरील सारणीचे अवलोकन केले असता असे दिसते की, इचलकरंजी नगरपरिषदेच्या २००१ ते २००६ च्या निवडणूकीमध्ये ४३ महिला सदस्यांपैकी ३० महिला सदस्यांना निर्णय प्रक्रियेत कुटुंबाचे सहकार्य मिळत असल्याचे दिसते. या महिला सदस्यांमध्ये अनौपचारिक चर्चा करताना असे आढळून आले की, महिला सदस्यांच्या निर्णय प्रक्रियेत त्यांच्या पतीचे किंवा मुलाचा अप्रत्यक्षपणे हस्तक्षेप झालेला दिसून येतो. आलेखावरून असे दिसते की, ३०.२४ टक्के महिला सदस्यांचा निर्णय प्रक्रियेत कुटुंबाचे सहकार्य दिसून येत नाही. यावरून असे स्पष्ट होते की, महिलांचा निर्णय प्रक्रियेत सहभाग वाढला असला तरी अजुनही महिला सक्षमपणे आपले मत मांडू शकत नाहीत.


तक्ता क्रं. ४.८

**महिला सदस्य व राजकीय पक्षातील निर्णय प्रक्रियेत सहभाग**

| अ. नं. | पर्याय | प्रतिनिधी | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | होय | ३७ | ८६.०५ |
| २ | नाही | ०६ | १३.९५ |
| | एकूण | ४३ | १०० |

स्त्रोत:— प्रश्नावली नूसार

आलेख क्रं. ४.८




१

उपरोक्त सारणीवरून असे दिसून येते की, राजकीय पक्षांच्या निर्णय प्रक्रियेत महिलांचा सहभाग ५० टक्के पेक्षा अधिक दिसून येतो. आलेखावरून असे दिसते की, एकुण राजकीय पक्षांच्या निर्णयामध्ये ८६.०५ टक्के महिलांचा सहभाग राजकीय पक्षांच्या विविध पातळीवर निर्णय प्रक्रियेत दिसून येतो. यावरून असे स्पष्ट होते की, राजकीय पक्षांच्या निर्णय प्रक्रियेतील सहभागामुळे महिला नेतृत्वाची निर्मिती होते. ज्यामुळे महिलांचा राजकारणातील सहभाग वाढतो.


**तक्ता क्रं. ४.९**

**महिला सदस्य व निर्णय प्रक्रियेतील अमंलबजावणीसंबधी समस्या**

| अ. नं. | समस्या | प्रतिनिधी | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | अधिकारी व कर्मचारी संबधी समस्या | ०५ | ११.६३ |
| २ | पुरूष सदस्यांचे अवास्तव हस्तक्षेप | १५ | ३४.८८ |
| ३ | राजकीय पक्षश्रेष्ठींचा हस्तक्षेप | १० | २३.२६ |
| ४ | कुटुंब सदस्यांचा हस्तक्षेप | १३ | ३०.२३ |
| | एकुण | ४३ | १०० |

स्त्रोत:— प्रश्नावली नूसार

आलेख क्रं. ४.९




वरील सारणीवरून असे दिसून येते की, महिलांच्या निर्णय प्रक्रियेतील अमंलबजावणीमधील नगरपालिकेतील कर्मचा—यांच्या सहकार्याची समस्या ४३ महिला सदस्यांपैकी ५ महिला सदस्यांना दिसून येते. तसेच महिलांच्या सदस्यांच्या निर्णय प्रक्रियेतील अंमलबजावणीत पुरूष सदस्यांचे अवास्तव हस्तक्षेप १५ महिला सदस्यांना आढळलेले दिसते. आलेखावरून असे दिसते की, इचलकरंजी नगरपालिकेच्या सभागृहातील २००१ व २००६ च्या निवडणूकीमध्ये निवडून आलेल्या महिला सदस्यांना आपल्या निर्णय प्रक्रियेच्या अंमलबजावणीच्या समस्येत पुरूष सदस्यांचे ३४.८८ टक्के हस्तक्षेप दिसतो. तर राजकीय पक्षांच्या पक्षश्रेष्ठींचा दबाव २३.२६ टक्के दिसून येतो आणि कुटुंबातील सदस्यांचा प्रभाव ३०.२३ टक्के दिसतो. वरील विवेचनांवरून असे दिसून येते की, महिला सदस्यांना आपल्या निर्णयाची अंमलबजावणी करताना वेगवेगळया समस्यांना तोंड द्यावे लागते. जर महिलांना त्यांच्या अंमलबजावणीत योग्य असे सहकार्य केल्यास ते आपले निर्णय योग्य प्रकारे राबवून विकास घडवू शकतील.

### ४.३ इचलकरंजी नगरपरिषदेतील महिलांचे स्थानिक विकासातील प्रभावः—

महिलां सदस्यांचा स्थानिक विकासातील प्रभावाची चर्चा करताना इचलकरंजी नगरपरिषदेचा अभ्यास केला आहे. नगरपरिषद हे शहरी जीवनावर प्रभाव पाडणारी महत्वपूर्ण संस्था असून शहराच्या विकासाच्या दृष्टिकोनातून ती कार्यरत असते. अशा या शहरी विकासामध्ये महिलांचाही प्रभाव कितपत आहे. या संदर्भात इचलकरंजी नगरपरिषदेचा अभ्यास केला या नगरपरिषदेमध्ये २००१ व २००६ मधील निवडणूकीमध्ये निवडून आलेल्या ४३ महिला सदस्यांची निवड करून प्रश्नावलीच्या माध्यमातून त्यांचा इचलकरंजी नगरपरिषदेच्या माध्यमातून शहरी विकासातील प्रभाव अभ्यासला.

**तक्ता क्रं. ४.१०**

**शहरी विकासाबदल आवड**

| अ. नं. | पर्याय | प्रतिनिधी | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | होय | ४३ | १०० |
| २ | नाही | ०० | ०० |
| | एकूण | ४३ | १०० |

स्त्रोतः— प्रश्नावली नूसार

उपरोक्त सारणीचे विश्लेषण केले असता असे दिसते की, सर्वच महिला सदस्यांना शहर विकासाची आवड दिसून येते. शहर विकासाची आवड असली तरी अनौपचारिकरित्या त्यांच्याशी चर्चा केली असता असे आढळून आले की, शहर विकासाची आवड ही आपल्या मित्र—मैत्रिणीच्या व मुलांच्या प्रेरणेमुळे निर्माण झाली. असे असले तरी आज राजकीय पक्षांच्याकडून निवडून येणा—या महिला सदस्या म्हणतात की, राजकीय पक्षाच्या जाहीरनाम्यात फारसा उल्लेख नसतो.


तक्ता क्रं. ४.११

शहरी विकासाचा प्राधान्यक्रम

| अ. नं. | पर्याय | प्रतिनिधी | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | पिण्याच्या पाण्याचा पुरवठा | १६ | ३७.२१ |
| २ | सांडपाण्याची व्यवस्था | १० | २३.२५ |
| ३ | सार्वजनिक स्वच्छता | १२ | २७.९१ |
| ४ | रस्ते व दिवाबत्ती | २ | ०४.६५ |
| ५ | शिक्षण व आरोग्य सुविधा | ३ | ०६.९८ |
| | एकुण | ४३ | १०० |

स्त्रोतः— प्रश्नावली नूसार

आलेख क्रं. ४.१०




वरील सारणीचे विश्लेषण केले असता असे दिसून येते की, महिला सदस्यांचे सर्वात जास्त प्राधान्य पिण्याच्या पाण्याला आहे. तर सार्वजनिक स्वच्छतेला त्यांनी पिण्याच्या पाण्यानंतर अधिक महत्व दिले आहे. आलेखावरून असे दिसते की, महिलांच्या दररोजच्या समस्येमध्ये पिण्याच्या पाण्याची समस्या हा एक कळीचा मुद्दा असतो व ३७.२१ टक्के महिलांनी हा प्रश्न प्राधान्यक्रमाने सोडवण्याचा विचार केलेला दिसतो. त्यानंतर २७.९१ टक्के महिला या सार्वजनिक स्वच्छतेकडे अधिक लक्ष देतात. तसेच

२३.२५ टक्के महिला या सांडपाण्याच्या प्रश्नाकडे प्राधान्याने लक्ष देत असताना दिसतात. त्याचबरोबर दिवाबत्तीची सोय सार्वजनिक आरोग्य आणि शिक्षण याकडे लक्ष देतात. यावरून असे स्पष्ट होते की, महिला सदस्यांना शहर विकासाच्या समस्यांना प्राधान्यक्रम देवून त्या सोडवण्याचा प्रयत्न करतात.


**तक्ता क्रं. ४.१२**

**महिलांना प्रभाग समस्येविषयी माहिती मिळण्याची माध्यमे**

| अ. नं. | पर्याय | प्रतिनिधी | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | वृतपत्र | १५ | ३४.८८ |
| २ | प्रत्यक्ष पाहणीव्दारे | १२ | २७.९१ |
| ३ | जनतेकडून | १५ | ३४.८८ |
| ४ | जनसंपर्क कार्यालय | १ | ०२.३३ |
|  | एकुण | ४३ | १०० |

स्त्रोत:— प्रश्नावली नूसार

**आलेख क्रं. ४.११**




वरील सारणीचे विश्लेषण करता असे दिसून येते की, इचलकरंजी नगरपरिषदेच्या क्षेत्रातील ज्या समस्या आहेत त्या समस्यांची माहिती ४३ महिला सदस्यांना १५ महिला सदस्यांना वृत्तपत्राच्या माध्यमातून तर १५ महिला सदस्यांना जनतेव्दारे मिळते.

१२ महिला सदस्यांना ही आपल्या प्रभागातील समस्येविषयी माहिती प्रत्यक्ष भेटीव्दारे मिळत असताना दिसते. वरील आलेखावरून असे दिसते की, वृत्तपत्र व जनतेच्या माध्यमातून ६९.७६ टक्के महिला सदस्यांना प्रभाग समस्यांची माहिती मिळते तर ०२.३३ टक्के माहिती जनसंपर्क कार्यालयातून मिळते. यावरून असे दिसते की, जनसंपर्क कार्यालयातून मिळणारी माहिती अत्यंत नगण्य असून समस्येंची माहिती पोहचविण्यामध्ये वृत्तपत्र व जनता ही प्रभावी भूमिका बजावते.

**तक्ता क्रं. ४.१३**

**महिला सदस्यांची सार्वजनिक स्वच्छतेविषयी दक्षता**

| अ. नं. | पर्याय | प्रतिनिधी | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | होय | ४३ | १०० |
| २ | नाही | ० | ० |
| | एकूण | ४३ | १०० |

स्त्रोत:— प्रश्नावली नूसार

वरील सारणीचे निरीक्षण केले असता असे दिसून येते की, इचलकरंजी परिक्षेत्रातील होणारे औद्योगिकीकरण वाढती लोकसंख्या घनकच—याची समस्या यावषियी सर्वच महिला सदस्यांना जाणीव असलेली दिसून येते. त्या आपल्या सदस्याच्या अधिकाराचा वापर करून स्वच्छतेसंबंधी लक्ष घालताना दिसून येतात.

**तक्ता क्रं. ४.१४**

**सार्वजनिक स्वच्छतेचे आधारभूत घटक**


| अ. नं. | घटक | प्रतिनिधी | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | नगरपालिकेतील कामगार | ३२ | ७४.४२ |
| २ | नागरी स्वच्छता अभियान | ०८ | १८.६० |
| ३ | तंत्रज्ञानाचा वापर | ०३ | ०६.९८ |
| | एकुण | ४३ | १०० |

स्त्रोत:— प्रश्नावली नूसार



SHIVAJI UNIVERSITY

आलेख क्रं. ४.१२




वरील सारणीचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, इचलकरंजी नगरपालिकेतील सार्वजनिक स्वच्छेतेतील सफाई कामगारांचा सहभाग ३२ महिला सदस्यांना आवश्यक वाटतो. तर ०८ महिला सदस्यांना नागरी स्वच्छता अभियान राबवून शहर स्वच्छ ठेवण्याचा प्रयत्न केला पाहिजे असे मत मांडले आहे. असे असले तरीही सार्वजनिक स्वच्छेतेविषयी शहर वासियांच्याकडून मिळणारे सहकार्य फारच अल्प असल्याचे अनौपचारिक चर्चेतून जाणवले. इचलकरंजी नगरपरिषदेतील महिला सदस्यांनी नगरपरिषदेच्या माध्यतातून व वैयक्तिक पातळीवरही वेगवेगळे गट स्थापन करून स्वच्छता मोहिम राबवताना दिसून येतात.


**तक्ता क्रं. ४.१५**

**महिला प्रतिनिधी व नागरी सेवा**

| अ. नं. | पर्याय | प्रतिनिधी | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | होय | ४० | ९३.०३ |
| २ | नाही | ०३ | ०६.९७ |
| | एकूण | ४३ | १०० |

स्त्रोत:— प्रश्नावली नूसार

**आलेख क्रं. ४.१३**




उपरोक्त सारणीचे विश्लेषण केले असता ४३ महिला सदस्यापैंकी ४० महिला सदस्यांनी नगरपरिषदेकडून उत्तम नागरी सेवा पुरविली जाते असे मत मांडले आहे तर ०३ महिला सदस्यांनी याबाबत नकारार्थी मत मांडून प्रशासनाबद्दल नाराजी व्यक्त केली आहे. आलेखावरून असे दिसून येते की, ९३.०३ टक्के महिला या प्रशासनातील नागरी सेवेबद्दल समाधानी असल्या तरी अनौपचारिकरित्या त्यांच्याशी चर्चा केली असता नगरपरिषदेच्या समस्यामुळेच उत्तम नागरी सेवा नगरपरिषदेला देता येत नसल्याचे मत मांडले आहे.


तक्ता क्रं. ४.१६

नागरी सेवा पुरविण्यात येणा—या समस्या

| अ. नं. | घटक | प्रतिनिधी | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | नगरपालिकेला निधीची कमतरता | ३६ | ८३.७२ |
| २ | प्रशासनातील भ्रष्टाचार | ०५ | ११.६३ |
| ३ | शहरवासियांची उदासीनता | ०२ | ०४.६५ |
| | एकुण | ४३ | १०० |

स्त्रोत:— प्रश्नावली नूसार

आलेख क्रं. ४.१४




उपरोक्त सारणीचे विवरण पाहता असे दिसून येते की, नागरी सेवा देण्यासंबंधी नगरपरिषदेला निधीची समस्या असल्याचे ३६ महिला सदस्यांनी मान्य केले. ०५ महिला सदस्यांनी प्रशासनातील राजकीय व प्रशासकीय भ्रष्टाचारामुळे सेवा देता येत नसल्याचे मत नोंदविले आलेखावरून असे दिसून येते की, ८३.७२ टक्के महिला सदस्यांनी पैशाची कमतरता हा नागरी सेवेतील महत्वपूर्ण समस्या म्हणून मान्य केली आहे तर ४.६५ टक्के महिला सदस्यांनी शहरवासियांच्या उदासीनतेकडे लक्ष वेधलेले आहे. उत्तम नागरी सेवा पुरवायचे असेल तर नगरपरिषदेला निधीचे नियोजन करून

निधी मिळवायचे माध्यम वाढवले पाहिजे तसेच भ्रष्टाचार विरहित प्रशासन हेच उत्तम नागरी सेवेचे तत्व आहे.


**तक्ता क्रं. ४.१७**

**महिला सदस्या व औद्यागिक विकासातील सहकार्य**

| अ. नं. | पर्याय | प्रतिनिधी | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | होय | ३९ | ९०.६९ |
| २ | नाही | ०४ | ०९.३१ |
| | एकूण | ४३ | १०० |

स्त्रोत:— प्रश्नावली नूसार

**आलेख क्रं. ४.१५**




वरील सारणीचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, इचलकरंजी नगरपरिषदेतील ४३ पैकी ३९ महिला सदस्या नगरपरिषदेच्या परिक्षेत्रात वाढत असलेल्या औद्योगिक क्षेत्रास सहकार्य करतात. इचलकरंजी नगरपालिका क्षेत्र टेक्सटाईल क्षेत्र असून या क्षेत्रात रोजगार करू इच्छिणा—या महिलांसाठी महिला क्रांती प्रशिक्षण योजना सुरू केले आहे. आलेखावरून आपणास दिसून येते की, ९०.६९ टक्के महिला नगरपरिषदेच्या औद्योगिक क्षेत्रास सहकार्य करून या क्षेत्राच्या विकासाला

हातभार लावतात. त्यादृष्टिकोनातून विविध महिला प्रशिक्षण कार्यक्रम नगरपालिकेच्या माध्यमातून राबवून महिलांच्या औद्योगिकीकरणामध्ये सक्षमीकरणाचा प्रयत्न करतात.

**तक्ता क्रं. ४.१८**

**महिला सदस्या व महिला बालकल्याण समितीतील सहभाग**

| अ. नं. | पर्याय | प्रतिनिधी | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | होय | ४३ | १०० |
| २ | नाही | ० | ० |
| | एकूण | ४३ | १०० |

स्त्रोत:—प्रश्नावलीनूसार

वरील सारणीचे विश्लेषण केले असता आपणास असे दिसून येते की, नगरपरिषदेच्या महिला बालकल्याण समितीत सर्वच महिलांचा सहभाग दिसून येतो. या समितीचे अध्यक्षपद महिला सदस्यांकडेच असते. या महिला बालकल्याण समितीच्या माध्यमातून नगरपरिषदेच्या परिक्षेत्रामध्ये विविध विकास कामे महिलासांठी राबविलेले दिसतात. त्यामध्ये स्वयंरोजगाराचे प्रशिक्षण, प्रौढशिक्षण वर्ग, बालवाडी वर्गाला कार्यान्वित करणे, महिला कलागुणांना वाव देण्यासाठी कार्यक्रमाचे नियोजन करणे असे अनेक उपक्रम या महिला बालकल्याण समितीच्या रूपाने राबविले जातात.


**तक्ता क्रं. ४.१९**

**महिला सहभाग व नगरपरिषदेतील प्रशासनात बदल**

| अ.नं. | बदल | प्रतिनिधी | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | महिला सदस्याबद्दल सकारात्मक दृष्टिकोन | ३५ | ८१.४० |
| २ | राजकारीणातील गुंडगिरी कमी झाली | ०१ | ०२.३३ |
| ३ | स्त्रियांचे व शहरातील समस्या सोडविण्यास मदत झाली | ०७ | १६.२७ |
| | एकूण | ४३ | १०० |

स्त्रोत:— प्रश्नावली नूसार

आलेख क्रं. ४.१६




वरील सारणीचे विश्लेषण केले असता असे दिसून येते की, महिला नेतृत्वाचा प्रशासनातील सहभागामुळे बदल घडून आलेले दिसतात. ४३ पैकी ३५ महिला सदस्यांनी महिला या आता अधिक सकारात्मक दृष्टिकोनातून प्रशासनाकडे पाहू लागल्या आहेत असे मत नोंदवले आहेत. तर ७ महिला सदस्यांनी या स्त्रियांचे प्रश्न जाणून त्या सोडविण्यास मदत झाली. असे मत नोंदवले. वरील आलेखावरून असे स्पष्ट होते ८१.४० टक्के महिला या प्रशासनात सहभागी झाल्यापासून प्रशासनाच्या कामाकडे सकारात्मक दृष्टिकोनातून पाहतात. तसेच १६.२७ टक्के महिला या प्रशासनात आल्यामुळे महिलांच्या समस्या सोडविण्यासाठी मदत झाल्याचे आपणास आलेखावरून दिसून येते. महिलांच्या सक्षमीकरणाच्या दृष्टिकोनातून ही महत्वपूर्ण गोष्ट असून ५० टक्के आरक्षणामुळे महिलांचा प्रशासनामध्ये सहभाग वाढलेला आहे.

तक्ता क्रं. ४.२०

महिला सदस्या व नगरपरिषदेतील प्रशासनातसंबंधी उपाय

| अ. नं. | उपाय | एकुण प्रतिनिधी | नोंदविलेली मते | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| १ | नगरपरिषदेमधील नागरिकांसाठी माहिती उपलब्ध करून देण्यात यावी | ४३ | ४० | ९३.०२ |
| २ | नगरपरिषदेने स्वयंसेवी संघटनेची मदत घ्यावी | ४३ | ३० | ६९.७६ |
| ३ | नगरपरिषदेतील सदस्यांना प्रशासनाविषयी प्रशिक्षण असावे | ४३ | २५ | ५८.१४ |
| ४ | भ्रष्टाचार निर्मुलन कक्ष असावा | ४३ | २४ | ५५.८१ |
| ५ | शिक्षण, आरोग्य, स्वच्छता याविषयी कमिटींची दक्षता असावी. | ४३ | ३५ | ८१.४० |
| ६ | नगरपरिषदेच्या प्रशासनात जनतेचा सहभागही घेतला जावा | ४३ | ३५ | ८१.४० |

स्त्रोत:— प्रश्नावली नूसार

उपरोक्त सारणीचे विश्लेषण केले असता असे दिसून येते की, नगरपरिषदेच्या परिक्षेत्रातील नागरिकांना नगरपालिकेची माहिती तिचे कामकाज कशा पध्दतीने चालते यासंबंधी माहिती देणारे एक कक्ष असावे असे एकुण महिला सदस्यांपैकी ९३.०२ टक्के महिला संदस्यांना वाटत असल्याचे दिसून येते. नगरपरिषदेच्या कामकाजामध्ये स्वयंसेवी संघटनांची मदत घ्यावी असे ४३ पैकी ३० महिला सदस्यांना वाटते. नगरपरिषदेच्या परिक्षेत्रात आरोग्य, शिक्षण यासारख्या सुविधा उपलब्ध होण्यासाठी जागृती निर्माण केली जावी या सुविधा नागरिकांपर्यंत पोहचल्या पाहिजेत असे एकुण महिला सदस्यांपैकी ३५ महिला सदस्यांना वाटते. तर प्रशासनातील भ्रष्टाचार निर्मुलन कक्ष असावे असे २५ महिलांना आणि प्रशासन कसे चालवता यावे याचे प्रशिक्षण मिळाले पाहिजे असे २५ महिलांना वाटते. सारणीवरून असे दिसून येते की,

नगरपरिषदेच्या प्रशासनामध्ये जनतेचा सहभाग वाढवा असे एकुण महिला सदस्यांपैकी ८१.४० टक्के महिला सदस्यांना याविषयी उपाययोजना केल्या जाव्यात असे मत नोंदविले आहे.

विविध प्रश्नावलीच्या माध्यमातून इंचलकरंजी नगरपरिषदेतील महिला नगरसेवकांची सक्रीयता प्रशासनात दिसून येते. महिला नगरसेवक व नगराध्यक्षा झाल्यापासून नगरपरिषद क्षेत्रात पुढील कार्ये झाली आहेत.

- **महिला क्रांती प्रशिक्षण योजना :**

इचलकरंजी नगरपरिषदेने १९ ऑगस्ट २००४ पासून महाराष्ट्रात प्रथमच प्रायोगीक तत्वावर महिला क्रांती प्रशिक्षण योजना सूरू केली. या योजनेअंतर्गत महिलांना प्रशिक्षण देणे, दोरा, कापड बटण या कच्च्या मालाचा पुरवठा करणे. यासाठी आवश्यक मशिनरीची देखभाल करणे तसेच प्रशिक्षणार्थी महिलांकडून तयार कपडे विक्री करणे, या सर्वाचां समावेश यात केला जातो. या योजनेसाठी प्रथम वर्षीसाठी १ कोटी खर्चाची तरतूद केली असून यातील ५० टक्के नगरपरिषदेच्या माध्यमातून केले जाणार आहे. ही योजना नगरपरिषदेच्या बालकल्याण समितीच्या अंतर्गत इचलकरंजी शहरात कार्यरत आहे. या योजनेच्या गेल्या ५ वर्षामध्ये १६०० महिलांनी प्रशिक्षण घेतले असून त्या स्वावलंबी बनल्या आहेत.

- **महिला महोत्सव २००५**

इचलकरंजी शहरातील महिलांच्या विकासासाठी त्यांनी तयार केलेल्या उत्पादीत मालाला उठाव मिळावा. तसेच विविध क्षेत्रात उत्कृष्ट कामगिरी केलेल्या महिलांचे मनोगत व त्यांचे प्रबोधपर व्याख्यान तसेच महिला करता विविध स्पर्धाचे आयोजन या सर्वासाठी २ ते ७ ऑक्टोबर २००५ मध्ये महिला महोत्सव आयोजीत केले आहे. या महोत्सवाच्या निमित्ताने विविध महिला बचत गटाच्या उत्पादीत मालाची प्रदर्शन व विक्री मोठया प्रमाणात झाली. महिलांना आपण ही उद्योजक होवू शकतो असा आत्मविश्वास निर्माण झाला.

- **गरीब रूग्णांना मेडीकल योजना**

इचलकरंजी नगपरिषदेने २००८ पासून धोरणात्मक निर्णय घेऊन इंदिरा गांधी मेमोरियल हॉस्पिटलच्या माध्यमातून १७५ बेडची सुविधा नगरपरिषदेच्या स्वनिधीतून दिले आहे. या योजनेसाठी १४ लाख ६४ हजार इतकी रक्कम नगरपरिषदेने दिले आहे.

- **घर तेथे शौचालय योजना**

इचलकरंजी नगरपालीकेने शहरात आर्थिक दुर्बल घटकासाठी केंद्र व राज्य शासन पुरस्कृत शौचालय संबधीची योजना लागू केली आणि शहरातील सर्व बी.पी.एल कुटुंबांचा यात समावेश केला आहे.

- **इतर कार्य**
  - शहरात एकुण ११ ठिकाणी हायस्टम दिवे बसवले आहेत
  - शहरातील रस्ते व्यवस्थीत करण्यासाठी ५ कोटीचे अनुदान मंजूर केले आहे.
  - घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प, भुयारी गटार योजना, स्टॉर्म वॉटर ड्रेनेज सिस्टीम कामे मंजूर करून कार्यान्वीत केली.
  - इंचलकरंजी नगरपरिषदेतील क्षेत्रात ३५६५ झाडे लावली यातील ३००० झाडे जगली
  - २००१ पासून अनुकंपा तत्वावरील भरतीबाबत अनेक प्रलंबिल प्रकरणे मार्गी लावली.
  - शहरातील एकून ११ पाण्याच्या टाक्या बांधल्या गेल्या.
  - शहरातील एकून १३ वार्ड मध्ये २८ दारिद्रय रेषेखालील महिला बचत गटांना साफसफाईचा ठेका देण्यात आला आहे.
  - कॅटरिंग कुकींग कोर्सेस या अंतर्गत आतापर्यत २००५ते २००६ दरम्यान २७० लाभार्थी, २००७ते २००८ दरम्यान २७० लाभार्थी, २००८ते २००९ दरम्यान ५६० लाभार्थींनां लाभ झाला आहे.
  - कुष्ठरोगी वसाहतीतील वारसांची नांवे प्रॉपर्टीला लावली
  - मुस्लीम कब्रस्तानासाठी जागा आरक्षित केली

अशाप्रकारची कार्ये करण्यात आली आहेत. या कार्याच्या माध्यमातून महिला नगसेवकांनी आपला प्रभाव नगरपरिषदेच्या परिक्षेत्रात निर्माण केला आहे.

४.४ **समारोप:—**

प्रस्तुत प्रकरणामध्ये महिलांचा नगरपरिषदेमधील निर्णय प्रक्रियेतील व शहर विकासातील प्रभाव आपल्याला दिसून येतो. महिलांना स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये ५० टक्के आरक्षण प्राप्त झालेले असल्यामुळे त्यांचे सदस्यत्व वाढलेले दिसून येते. इचलकरंजी नगरपरिषदेतील २००१ व २००६ च्या निवडणूकीत निवडून आलेल्या महिला सदस्यांचा नगरपरिषदेतील निर्णय प्रक्रियेतील सक्रिय सहभाग दिसून येतो. त्याचप्रमाणे शहराच्या विकासासंदर्भात त्यांची जागृती विकासासंबंधी त्यांची मते यातुन त्यांचा प्रभावही वाढत चाललेला दिसून येतो. हा एक सकारात्मक बदल म्हणावा लागेल. नगरपरिषदेमध्ये महिला सदस्यत्वाचा सक्रियपणाचा शहरातील स्वराज्य संस्थेतील बदलत असलेले चित्र दिसून येते.

संदर्भसूची ः


१ आहुजा राम, पॉलिटिकल आवरनेस ॲन्ड पॉलीटिकल पार्टिसिपेशन ऑफ वुमन इन रूरल एरियज, जर्नरल ऑफ सोशालॉजिकल स्टडिज , व्हॅल्युम १९८५ .

२ इंचलकरंजी आवृत्ती, दैनिक सकाळ,२२ डिसेंबर, २००६ .

३ इंचलकरंजी आवृत्ती, दैनिक महासत्ता,दि . ९ डिसेंबर,२००६

४ इंचलकरंजी आवृत्ती, दैनिक सकाळ,१८ एप्रील, २००७

५ इंचलकरंजी आवृत्ती, दैनिक सकाळ,३ जानेवारी, २००७

६ इंचलकरंजी आवृत्ती, दैनिक पुढारी दि २३ नोव्हेंबर २००८

७ महाराष्ट्र सरकार महाराष्ट्राची आर्थिक पाहणी,मूबई, महाराष्ट्र,२००८

८ डॉ .सुहास पळशीकर, भारतीय राजकाराणाची प्रकीया , य .श .मु .विद्यापीठ

९ पवार (डॉ) जे. के.,भारत वय वर्षे ६०, राजप्रकाशन कोल्हापूर , २००९

१० महाराष्ट्र शासन २००२, मानव विकास अहवाल,महाराष्ट्र शासन, मुबई .

११ जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन, २०११ कोल्हापूर जिल्हा

१२ महाराष्ट्र शासन २०१२, मानव विकास अहवाल,महाराष्ट्र शासन, मुबई .

१३ एन .एन .ओझा, भारत की सामाजिक समस्यांए , कॉनिकल पब्लिशिंग